
# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ मार्च २०२६


## राजू बाविस्कर यांच्या 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मचरित्राची साहित्य अकादमीसाठी शिफारस




साहित्य क्षेत्रातील अत्यंत मानाच्या अशा साहित्य अकादमी पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. मराठी भाषेतून साहित्यिक राजू बाविस्कर यांच्या काळ्यानिळ्या रेषा या आत्मचरित्राची साहित्य अकादमी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. मराठी भाषेतून शिफारस करण्यात आलेल्या एकूण 11 पुस्तकांमधून बाविस्कर यांच्या साहित्य कृतीची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

राजू बाविस्कर हे एक प्रसिद्ध मराठी चित्रकार आणि लेखक आहेत. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना अत्यंत प्रतिष्ठेचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांना सन्मानचिन्ह (कोरीव ताम्रपट), शाल आणि 1 लाख रुपये रोख रक्कम पुरस्काराच्या स्वरुपात दिली जाईल. 31 मार्च 2026 रोजी नवी दिल्ली येथे आयोजित एका समारंभात हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

राजू बाविस्कर यांचे 'काळ्यानिळ्या रेषा' हे आत्मकथन विशेष गाजले आहे. राजहंस प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले असून त्यात त्यांनी आपल्या चित्रकला प्रवासासोबतच वंचित वर्गातील संघर्षाचे चित्रण केले आहे. त्यांच्या 'काळ्या निळ्या रेषा' या पुस्तकाचा समावेश एमएच्या अभ्यासक्रमातही करण्यात आला आहे. विशेष म्हणजे राजू बाविस्कर हे मूळचे जळगाव जिल्ह्यातील आहेत. बाविस्कर यांची चित्रकार म्हणूनही ओळख आहे. त्यांनी अनेक पुस्तकांची मुखपृष्ठे आणि आतील रेखाचित्रे तयार केली आहेत. (पिवळा पिवळा पाचोळा)

•साहित्य अकादमी पुरस्कार (२०२५-२६) - 'काळ्या निळ्या रेषा' या आत्मकथनासाठी.

•महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'लक्ष्मीबाई टिळक वाङ्मय पुरस्कार'.

•मराठवाडा साहित्य परिषदेचा 'यशवंतराव चव्हाण विशेष वाङ्मय पुरस्कार'.

साहित्य अकादमीने २०२५ च्या पुरस्कारांसाठी २४ भाषांमधून ८ काव्यसंग्रह, ४ कादंबऱ्या, ६ लघुकथा संग्रह, २ निबंधसंग्रह, १ साहित्य समीक्षा ग्रंथ, १ आत्मचरित्र आणि २ स्मरणिकांची निवड केली आहे.


दरवर्षी, साहित्य अकादमी एका निर्धारित प्रक्रियेद्वारे आपल्या मान्यताप्राप्त २४ भाषांमध्ये हे पुरस्कार प्रदान करते. साहित्य अकादमी पुरस्कार २०२५ साठीची प्रक्रिया जानेवारी २०२५ मध्ये सुरू झाली; या अंतर्गत ३० जानेवारी २०२५ रोजी एक खुली जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. २४ भारतीय भाषांमधील प्रतिष्ठित परीक्षक मंडळाच्या सदस्यांनी शिफारस केलेल्या या पुरस्कारांना, साहित्य अकादमीच्या सक्षम प्राधिकरणाने मंजुरी दिली आहे.

## विज्ञान प्रदर्शनात इनायत इनामदार प्रथम




**छत्रपती संभाजीनगर** : येथील विंचेस्टर इंटरनॅशनल स्कूल मध्ये आयोजित विज्ञान प्रदर्शनात इ ७ वी चा विद्यार्थी इनायत इरफान इनामदार याच्या प्रकल्पास प्रथम क्रमांक मिळाला. इनायत इनामदार याने 'श्वसन प्रणाली' (Respiratory System) वर सादर केलेले शोध प्रकल्प व सादरीकरण उत्कृष्ठ होते असे परिक्षकांनी सांगितले. हा पुरस्कार उम्मीद कल्चरल फाऊंडेशन चे अध्यक्ष आणि बॉम्बे मार्कंटाईल बँकेचे संचालक मंजूर खान मसुद यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी अमियाचे संचालक यासर मंजूर खान यांची प्रमुख उपस्थिती होती. इनायत इनामदार हा साहिल कॉम्प्युटर्स चे संचालक इरफान इनामदार यांचा मुलगा असून ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्रचार्य डॉ. हसन इनामदार यांचा पुतण्या आहे. त्याच्या या अशा बद्दल विंचेस्टर शाळेचे संचालक आणि मुख्याध्यापक डॉ. अफसर खान, वर्गशिक्षिका शाजीया अंजूम, व इतर सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## मंत्रालयातील 'दुसरे पंत' हरपले : ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी गो. श्री. पंतबाळेकुंद्री यांचे निधन



**मुंबई** : महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे निवृत्त सहसचिव आणि प्रशासकीय वर्तुळात 'पंत' या नावाने सुपरिचित असलेले नामवंत अधिकारी गो. श्री. पंतबाळेकुंद्री यांचे आज, सोमवार १६ मार्च २०२६ रोजी ठाणे येथे वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले.

माजी मुख्यमंत्री स्वर्गीय मनोहर जोशी यांच्या कार्यकाळात त्यांनी मंत्रालयात मोलाची जबाबदारी सांभाळली होती. योगायोगाने जोशी आणि पंतबाळेकुंद्री या दोघांचीही ओळख 'पंत' अशीच असल्याने त्यावेळी राजकीय व प्रशासकीय वर्तुळात त्यांची मोठी चर्चा असायची. आपल्या कार्यकुशलतेने वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या पंतबाळेकुंद्री यांच्या पश्चात पत्नी, मुलगा अभिजीत, विवाहित कन्या आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या, मंगळवार १७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता ठाणे येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

मंत्रालयात एकेकाळी दोन 'पंत' अत्यंत प्रभावशाली मानले जात — एक तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि दुसरे म्हणजे नगर विकास विभागातील दिग्गज अधिकारी गो. श्री. पंतबाळेकुंद्री. नगर विकासाच्या कोणत्याही जटिल विषयात 'पंतांना विचारा' हा जणू अंतिम शब्द असे. अगदी राजभवनही याला अपवाद नसे. कायद्याचे सखोल ज्ञान आणि अत्यंत निरीच्छ वृत्ती ही त्यांची खरी ताकद होती. ज्या पदावर बसून अमाप संपत्ती मिळवणे सहज शक्य होते, तिथे पंतांनी आपल्या प्रामाणिकपणाची कास कधीच सोडली नाही. त्यामुळे त्यांच्या शब्दाला प्रशासनात एक वेगळेच वजन प्राप्त झाले होते.

नामवंत कायदेतज्ज्ञ रामराव आदिक असोत, शीघ्रकोपी पतंगराव कदम असोत किंवा शिस्तप्रिय द. म. सुखटणकर, या सर्वांनाच पंतांच्या अभ्यासू वृत्तीचा आणि विद्वत्तेचा आदर करावा लागे. मंत्रालयातील कर्मचारी आणि त्या काळातील वार्ताहर या आदराचे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत. पंतांचे 'आत्मभान' हे छोटेखानी आत्मकथन वाचताना त्यांच्या या करारी व्यक्तिमत्त्वाचा सहज प्रत्यय येतो. केवळ प्रशासनच नव्हे, तर मुंबई उच्च न्यायालयातही त्यांची मोठी प्रतिष्ठा होती. शासनाची बाजू मांडताना त्यांनी एखादा मुद्दा मांडला की न्यायालय तो सामान्यपणे ग्राह्य धरत असे, हीच त्यांच्या दीर्घ प्रशासकीय सेवेची आणि निस्पृहतेची मोठी पावती होती.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903